असा. क्र. ५३.

रजिस्टर्ड नं. टीइसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, डिसेंबर १५, २००४/अग्रहायण २४, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**दिनांक १५ डिसेंबर २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.**

**अ. मा. शिंदेकर,**
**सचिव,**
**महाराष्ट्र शासन,**
**विधी व न्याय विभाग**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.**

**(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १५ डिसेंबर २००४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)**

**राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची स्थापना व त्याचे कायद्याने संस्थापन करण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम**

ज्याअर्थी, समाजाच्या हितासाठी, समाजाला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांमध्ये, विज्ञान व तंत्रज्ञानाचे उपयोजन करण्यामध्ये वाढ करणे, त्याचा प्रसार करणे आणि त्यास चालना देणे यासाठी एक विज्ञान व तंत्रज्ञान आयोग स्थापन करणे व तो कायद्याने संस्थापित करणे आणि त्याकरिता तरतूद करणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांकरिता विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची स्थापना व त्याची कायद्याने संस्थापना करण्याकरिता कायदा करण्यासाठी त्वरित कार्यवाही

करणे ज्यामुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, दिनांक २१ जुलै २००४ रोजी राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग अध्यादेश, २००४, प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. २०.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचावनाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २१ जुलै २००४ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " आनुषंगिक नियुक्ती " याचा अर्थ, एखादे महाविद्यालय, संस्था, विद्यापीठ, उद्योग, संशोधन संस्था किंवा संघटना यांमध्ये अगोदरच काम करीत असलेल्या आणि आयोगाच्या प्रकल्पांची किंवा कार्यांची मांडणी, त्यांची चाचणी वा अंमलबजावणी, अथवा त्यांचे मूल्यमापन ह्या बाबी पार पाडण्यामध्ये आयोगाशी संलग्न असलेल्या एखाद्या व्यक्तीची, आयोगाने केलेली समवर्ती नियुक्ती, असा आहे ;

(ख) " आयोग " याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेला, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, असा आहे ;

(ग) " कंत्राटी तत्त्वावरील नियुक्ती " याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीची एखाद्या विनिर्दिष्ट प्रकल्प कार्यासाठी किंवा विनिर्दिष्ट कालावधीसाठी कंत्राटी तत्त्वावर केलेली नियुक्ती, असा आहे ;

(घ) " निधी " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १५ मध्ये निर्देश केलेला, आयोगाचा निधी, असा आहे ;

(ङ) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " सदस्य " याचा अर्थ, आयोगाचा सदस्य असा आहे आणि त्यात आयोगाचा अध्यक्ष व सदस्य-सचिव यांचा अंतर्भाव होतो ;

(छ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ज) " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमाखाली आयोगाने केलेले विनियम, असा आहे ;

(झ) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमाखाली शासनाने केलेले नियम, असा आहे ;

(ञ) "नियत अवधीची नियुक्ती" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीची विनिर्दिष्ट कालावधीसाठी केलेली व असा विनिर्दिष्ट कालावधी संमाप्त होण्यापूर्वी ती पुन:स्थापित करण्यात आली नसेल तर, असा कालावधी समाप्त होताच आपोआप रद्द होणारी नियुक्ती, असा आहे.

## प्रकरण दोन

## आयोग घटित होणे, उद्दिष्टे, कार्ये, कामकाज, कर्मचारीवर्ग, स्थान व व्यवस्थापन

३. (१) समाजाला भेडसावत असलेल्या विविध प्रश्नांमध्ये आणि विकासविषयक कामांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाचे उपयोजन करण्यामध्ये वाढ करण्यासाठी, त्याचा प्रसार करण्यासाठी आणि त्यास चालना देण्यासाठी, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग" नावाचा एक आयोग स्थापन करता येईल. आयोगाची स्थापना.

(२) आयोग हा उपरोक्त नावाचा, एक अखंड परंपरा व सामायिक मोहोर असलेला निगम निकाय असेल. त्याला जंगम, स्थावर व बौद्धिक मालमत्ता संपादित करण्याचा, ती धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा तसेच उक्त नावाने संविदा करण्याचा व दावा दाखल करण्याचा अधिकार असेल व त्या नावाने त्याच्याविरुद्ध दावा दाखल करता येईल.

४. (१) आयोग पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल,— आयोग घटित होणे.

(क) शासनाने नियुक्त करावयाचा एक अध्यक्ष, जो, समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी, विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीचा उपयोग करून घेण्याचा व्यापक व विविधांगी अनुभव असलेलीआणि प्राधान्याने सामाजिक-आर्थिक विश्लेषण करण्याचा अनुभव असलेली मान्यवर शास्त्रज्ञ असणारी व्यक्ती असेल ;

(ख) शासनाने नियुक्त करावयाचा एक सदस्य-सचिव, जो, समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी, विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीचा उपयोग करून घेण्याचा व्यापक व विविधांगी अनुभव असलेली आणि प्राधान्याने सामाजिक-आर्थिक विश्लेषण करण्याचा अनुभव असलेली, शक्यतो वरिष्ठ शास्त्रज्ञ असणारी व्यक्ती असेल ; सदस्य-सचिव हा आयोगाच्या आस्थापनेचा कार्यकारी प्रमुख असेल. एखाद्या व्यक्तीची, सदस्य-सचिव म्हणून करावयाची निवड ही, वरिष्ठ वैज्ञानिक पदावर नियुक्ती करण्याकरिता भारत सरकारकडून अवलंबिण्यात येणाऱ्या प्रचलित पद्धतीच्या धर्तीवर, जसे शोध समितीमार्फत, जाहिरातीद्वारे, इत्यादी प्रकारे करण्यात येईल ;

(ग) राज्य शासनाने नियुक्त करावयाचे, पाचपेक्षा अधिक नसतील इतके इतर अशासकीय सदस्य, ज्यापैकी,—

(एक) दोनपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींपैकी व ज्यांना समाजाच्या भल्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीचा उपयोग करून घेण्याचा अनुभव असल्याचे सिद्ध झाले असेल, अशा व्यक्ती असतील ;

(दोन) किमान एक सदस्य, समाजाच्या भल्यासाठी, विज्ञान व तंत्रज्ञानामधील संशोधन व विकास क्षेत्रातील असेल ;

(तीन). उर्वरित सदस्य,—

(क). ज्यांना उद्योग किंवा शेतीचे ज्ञान किंवा त्यातील अनुभव असेल, किंवा

(ख) ज्या अभियांत्रिकी व्यवसायातील सदस्य असतील,—

अशा व्यक्तींमधून निवडण्यात येतील :

परंतु, निम्म्याहून कमी नसतील इतके अशासकीय सदस्य हे, ज्या व्यक्ती राज्य शासनाच्या, केंद्र सरकारच्या किंवा अन्य कोणत्याही राज्य शासनाच्या किंवा त्यांच्या उपक्रमाच्या सेवेत नसतील अशा व्यक्तींमधून, निवडण्यात येतील ;

(घ) शासनाचा मुख्य सचिव, वित्त विभागाचा सचिव, नियोजन विभागाचा सचिव आणि विज्ञान व तंत्रज्ञान यांचा प्रभारी सचिव हे, आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतील :

परंतु, वित्त विभागाच्या सचिवाला आयोगाचा सदस्य-वित्त (Member-Finance) म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल. त्यांचे आयोगाच्या वित्तीय बाबींवरील अभिप्राय व विचार हे, आयोगाकडून शक्य असेल तेथवर स्वीकारण्यात येतील. अशा प्रकरणात, उपस्थित सदस्यांचे साधे बहुमत घेऊन वित्तीय बाबींवर निर्णय घेता येईल. अध्यक्षांसह अन्य सदस्य आणि सदस्य-वित्त यांच्यात मतभेद असेल त्याबाबतीत, त्या प्रकरणावर, उपस्थित सदस्यांच्या दोन-तृतीयांश बहुमताने निर्णय घेण्यात येईल.

(२) राज्य शासन राजपत्रामध्ये सदस्यांच्या नियुक्त्या अधिसूचित करील, आणि अध्यक्ष, सदस्य-सचिव व पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये निर्दिष्ट केलेले तीन पेक्षा कमी नसतील इतके सदस्य यांची नावे प्रसिद्ध झाल्यावर, आयोग यथोचितरीत्या घटित झाल्याचे मानण्यात येईल.

अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी आणि नियुक्तीच्या शर्ती.

५. (१) अध्यक्ष आणि अशासकीय सदस्य यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात येईल आणि हा पाच वर्षांचा कालावधी कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये आयोग घटित झाल्याच्या दिनांकापासून संगणित करण्यात येईल :

परंतु, अध्यक्ष आणि सर्व अशासकीय सदस्य यांचा पाच वर्षांचा कालावधी एकाचवेळी समाप्त होणारा असेल आणि उर्वरित कोणत्याही सदस्याचा प्रत्यक्ष नियुक्तीचा दिनांक त्यानंतरचा असला तरी, कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये आयोग घटित झाल्याच्या दिनांकापासून तो संगणित करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, अध्यक्ष व सदस्य हे, पुनर्नियुक्तीसाठी पात्र असतील.

(२) अध्यक्ष, सदस्य-सचिव किंवा अशासकीय सदस्य याला, शासनाला उद्देशून स्वतःच्या सहीने, लेखी स्वरूपात केव्हाही, यथास्थिति अध्यक्षांच्या, सदस्य-सचिवांच्या किंवा अशासकीय सदस्याच्या पदाचा राजीनामा देता येईल :

परंतु असा पदाधिकारी, शासनाने त्यांचा राजीनामा स्वीकारेपर्यंत किंवा त्याच्या राजीनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीसाठी, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, पदावर राहणे चालू राहील.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शासनाला, एखाद्या व्यक्तीला, जर ती व्यक्ती,—

(क) अमुक्त नादार होईल ;

(ख) नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरली असेल व तिला कारावासाची शिक्षा झाली असेल :

(ग) विकल मनाची होईल व या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या तदर्थ वैद्यकीय मंडळाने तिला तसे घोषित केलेले असेल ;

(घ) काम करण्यास नकार देईल किंवा ती काम करण्यास असमर्थ होईल ;

(ङ) आयोगाकडून अनुपस्थित राहण्याची परवानगी घेतल्याखेरीज, आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिली असेल ;

(च) शासनाच्या मते, अशा व्यक्तीने अध्यक्ष, सदस्य-सचिव किंवा सदस्य पदाचा असा गैरवापर केला असेल की ज्यामुळे तिला पदावर ठेवणे जनहिताच्या दृष्टीने हानिकारक ठरेल किंवा अशी व्यक्ती अध्यक्ष, सदस्य-सचिव किंवा सदस्य म्हणून पुढे चालू राहणे अन्यथा अयोग्य किंवा अनुचित असेल ;

(छ) शासनाच्या मते, अशा व्यक्तीच्या कामगिरीचा दर्जा समाधानकारक नसेल किंवा अपेक्षित क्षमतेपर्यंत नसेल, तर,—

अध्यक्ष, सदस्य-सचिव, किंवा यथास्थिति, सदस्य यास पदावरून काढून टाकता येईल :

परंतु कोणत्याही व्यक्तीला, या बाबतीत लेखी कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, आणि शासनाने या प्रयोजनासाठी विशेषकरून घटित केलेल्या तज्ज्ञांच्या समितीने (त्या व्यक्तीस) अशा प्रकारे पदावरून काढून टाकण्याची शिफारस केल्याखेरीज व त्याबाबत मान्यता दिल्याखेरीज खंड (च) किंवा (छ) अन्वये पदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(४) या कलमाच्या पूर्वोक्त तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला, त्या त्या वेळी पद धारण करणाऱ्या अध्यक्षांचा आणि कोणत्याही किंवा सर्व अशासकीय सदस्यांचा पदावधी कमी करता येईल आणि शासनाला योग्य वाटेल अशा रीतीने, एकतर उर्वरित मुदतीसाठी किंवा पूर्ण पाच वर्षांच्या मुदतीसाठी नवीन अध्यक्षाची व इतर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करता येईल.

(५) पोट-कलम (२) किंवा (३) खाली किंवा अन्य कोणत्याही रीतीने एखादे पद रिक्त झाल्यावर,—

(एक) ते रिक्त पद अध्यक्षाचे असल्यास, अध्यक्ष म्हणून कोणत्याही अन्य सदस्याचे किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीचे नव्याने नामनिर्देशन करून ; आणि

(दोन) ते रिक्त पद सदस्याचे असल्यास, एखाद्या व्यक्तीचे नव्याने नामनिर्देशन करून, शक्यतो लवकर भरण्यात येईल,

आणि असा नामनिर्देशित केलेला सदस्य किंवा व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या रिक्त पदावर तिचे नामनिर्देशन करण्यात आले आहे, त्या व्यक्तीने, जर ते पद रिक्त झाले

नसते तर, जो उर्वरित काळ ते पद धारण केले असते, त्या उर्वरित पदावधीसाठी, असा अध्यक्ष, किंवा यथास्थिति सदस्य म्हणून ते पद धारण करील :

परंतु, अध्यक्षाचे पद वगळता, एखाद्या सदस्याचे पद, सदस्याच्या पदाची मुदत समाप्त होण्याच्या दिनांकापूर्वी सहा महिन्यांत रिक्त झाले असल्यास, ते रिक्त पद भरता येणार नाही.

(६) अध्यक्षाच्या आणि सदस्य-सचिवाच्या पदाचे पारिश्रमिक, भत्ते व सेवेच्या इतर अटी व शर्ती या बाबतीत राज्य शासनाने दिलेल्या आदेशाद्वारे निश्चित केल्या असतील त्याप्रमाणे असतील आणि अशासकीय सदस्यांच्या बाबतीत, त्या विहित केल्याप्रमाणे असतील.

आयोगाची ध्येये व उद्दिष्टे.

६. आयोगाची मुख्य ध्येये व उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील,—

(क) विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून (इनपूट) घडवून आणावयाच्या बदलासाठी, विकासासाठी व उन्नतीसाठी मध्यस्थ म्हणून काम करणे ;

(ख) विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासासाठी आणि त्याच्या दर्जावाढीसाठी विद्यापीठे, संशोधन व विकास संस्था आणि कोणतेही इतर उद्योग किंवा संस्था यांच्यातील समस्तर आंतरक्रिया वाढीस लागण्यासाठी मुख्य प्रस्तावक म्हणून काम करणे ;

(ग) अभ्यास, तंत्रज्ञान अनुकूलन, तंत्रज्ञानाचा वापर करून प्रकल्प तयार करणे, क्षेत्र प्रात्यक्षिक, आवश्यक प्रशिक्षण देणे, प्रकाशन आणि विचारविनिमय यांद्वारे विज्ञान व तंत्रज्ञानाच्या उपयोजनाचा प्रचार करणे ;

(घ) विज्ञान व तंत्रज्ञानाच्या उपयोजनाच्या प्रचारासाठी निश्चित केलेल्या प्रकल्पांकरिता आवश्यक बीज भांडवल व इतर निविष्टी पुरवणे ;

(ङ) विज्ञान व तंत्रज्ञानाचे व्यापक प्रमाणावर उपयोजन करण्यासाठी प्रयोगशाळा व इतर संशोधन उपक्रमांतून तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करण्यासाठी उत्प्रेरक (मार्गदर्शक) किंवा मदतगार म्हणून काम करणे ;

(च) टिकाऊ आर्थिक प्रगतीसाठी ज्ञानावर आधारित समाज निर्मिती करण्याकरिता शैक्षणिक क्षेत्रातील शोध, आरोग्य सेवांमधील सुधारणा यांसारख्या शासनाच्या समस्तर विभागातील शोधांच्या उपयोजनांची तालिका तयार करणे ;

(छ) इतर संस्थांमध्ये, जेथे अशा सुविधा उपलब्ध नसतील किंवा गरजेपेक्षा अपुऱ्या असतील अशा क्षेत्रांत किंवा विद्याशाखांत उपयोजनांशी संबंधित संशोधन व विकासाचे काम हाती घेण्यासाठी, साधनसामग्री व सुविधांची निर्मिती करणे ; आणि

(ज) विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या उपयोजनाच्या प्रचारासाठी कोणतीही अन्य कामे करणे.

आयोगाची कामे व व्याप्ती.

७. आयोगाची ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, आयोग, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कामे पार पाडील :—

(क) मूल्यवर्धित उत्पादने निर्माण करण्याच्या दृष्टीने कृषिविषयक सर्वेक्षण, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारे घटक, कारागीर, कुटीरोद्योग, लघु उद्योग युनिटे, शेतीवर आधारित उद्योग, बांधकाम साहित्य, उद्यानविषयक, शेतीविषयक,

गौण खनिजांचे आर्थिक समुपयोजन, सागरी उत्पादने आणि आयोग निश्चित करील असे इतर विषय यावर विशेष भर दिला जाईल अशा रीतीने तंत्रज्ञानातील उणिवा शोधून काढण्यासाठी अभ्यासक्रम व सर्वेक्षण हाती घेणे ;

(ख) तंत्रज्ञानातील नवनवीन पद्धती, शोधून काढून त्यांचा विकास करणे आणि अंमलबजावणीसाठी प्रकल्प तयार करणे ;

(ग) प्रकल्पाची अंमलबजावणी करणे व निधी उभारणे ;

(घ) व्यापक प्रमाणात प्रसार करण्यासाठी प्रकाशने, दृक् माध्यमे, सिनेमे, फिरती प्रदर्शने किंवा त्यांसारख्या माध्यमांद्वारे प्रकल्पांच्या परिणामासंबंधातील माहिती तसेच अन्य माहिती प्रसृत करणे ;

(ङ) आयोगाने विकसित केलेले तंत्रज्ञान किंवा कौशल्ये यासंबंधी सल्ला देणारी सेवा सुरू करणे ;

(च) लाभार्थीकरिता किंवा अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांकरिता कौशल्यात वाढ करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञान उपयोजनाभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे ;

(छ) आयोगाचे प्रकल्प निश्चित करणे किंवा त्यांची अंमलबजावणी करणे किंवा त्यांचे नियंत्रण करणे, या कामामध्ये सक्रिय असलेल्या संघटनांना किंवा संस्थांना आर्थिक व इतर पाठबळ पुरविणे ; त्यामध्ये, जेथे हार्डवेअर किंवा साधनसामग्रीच्या सुविधा अस्तित्वात नाहीत किंवा गरजेच्या तुलनेत अपुऱ्या आहेत अशा क्षेत्रात किंवा विद्याशाखांत त्या सुविधा निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचाही समावेश आहे ;

(ज) विज्ञान व तंत्रज्ञानाद्वारे रोजगाराच्या विशिष्ट संधी निर्माण करण्यास उत्तेजन देण्याच्या उद्देशाने, किंवा विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी, विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये उत्कर्ष साधणाऱ्या केंद्रांची किंवा उत्कर्ष साधणाऱ्या संस्थांची उभारणी करणे व त्यांचे पर्यवेक्षण करणे ;

(झ) ज्यांची प्रतिकृती तयार करता येईल अशा, अपारंपरिक ऊर्जा स्रोतांसाठी तंत्रज्ञान निश्चित करणे ;

(ञ) आयोगाचे ध्येय आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतर कोणतेही काम करणे :

परंतु, आयोगास संबद्ध पायाभूत संशोधनाला मर्यादित पाठिंबा देता येईल, तथापि, उपयोजनाभिमुख संशोधनास व विकास कार्याला तसेच, त्यानंतर त्याचा व्यापक प्रमाणावर उपयोग करण्यास चालना देणे ही आयोगाची मुख्य भूमिका असेल आणि आयोगाचे हे मूळ ध्येय व उद्दिष्ट ज्यातून प्रत्यक्षपणे साध्य होणार नाही असे कोणतेही काम किंवा कामे, आयोग हाती घेणार नाही किंवा त्यांना चालना देणार नाही आणि विशेषकरून, आयोग,—

(एक) जे यशस्वी ठरल्यास त्याचे प्रत्यक्ष उपयोजन किंवा अनुकूलन करता येणे शक्य नसेल अशा कोणत्याही संशोधनास चालना, पाठिंबा किंवा निधी देणार नाही ; आणि

(दोन) कोणताही अभ्यासक्रम किंवा प्रकल्प किंवा प्रक्रिया पूर्ण केल्यावर पदवी किंवा पदविका किंवा मान्यता देणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक कार्यांना चालना, पाठिंबा किंवा निधी देणार नाही.

आयोगाच्या कामकाजाची रीत किंवा कार्यपद्धती. ८. आयोगाची ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि त्याला नेमून दिलेली कामे पार पाडण्यासाठी, आयोग, विज्ञान व तंत्रज्ञानाचे उपयोजन अंतर्भूत असलेले प्रकल्प निश्चित करणे, तयार करणे आणि अंमलबजावणी करणे यासाठी पुढील रीतीचा किंवा कार्यपद्धतीचा अंगीकार करील :—

(क) विज्ञान व तंत्रज्ञान निविष्टीच्या दृष्टीने, त्यांचा वापर करण्यास अवघड असलेली, व त्यांचा वापर करता येईल अशी क्षेत्रे निश्चित करण्यासाठी अंतर्गत (in-house) तसेच पुरस्कृत असे दोन्ही प्रकारचे अभ्यास हाती घेणे ;

(ख) तंत्रज्ञानातील त्रुटींचा शोध घेऊन, योग्य ते तंत्रज्ञान निश्चित करण्यासाठी, प्रकल्प तयार करण्यासाठी आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे पुनर्विलोकन करण्यासाठी चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा आणि चर्चा यांचे आयोजन करणे ;

(ग) संशोधन संस्था, विद्यापीठे, उद्योग, शासकीय अभिकरणे, व्यावसायिक संस्था, क्षेत्र अभिकरणे, स्वयंसेवी अभिकरणे आणि विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ व इतर व्यक्ती यांच्यामध्ये विचारांचे आदानप्रदान घडवून आणणे ;

(घ) खंड (ग) मध्ये निर्देशित केलेल्या असतील अशा संस्था, परिसंस्था किंवा अभिकरणे यांच्यातील विचारांच्या आदानप्रदानामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी यंत्रणा उभारणे ;

(ङ) प्रकल्पांची तांत्रिक-आर्थिक वर्धनक्षमता प्रस्थापित करण्यासाठी आणि प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी संस्था आणि तज्ज्ञ निश्चित करणे ;

(च) प्रकल्प निधी जमवणे आणि त्याचे संनियंत्रण आणि पुनर्विलोकन करणे ;

(छ) वाढता परिणाम साधण्यासाठी आणि सर्वदूर प्रसार करण्याच्या हेतूने, यशस्वी प्रकल्पांचे निष्कर्ष आणि सिद्ध झालेले तंत्रज्ञान प्रसिद्ध करणे ;

(ज) पायाभूत सुविधांमधील त्रुटी शोधून काढणे व इतर संस्थांमध्ये उपलब्ध नसतील अशा किंवा गरजेपेक्षा अपुऱ्या असतील अशा सुविधांच्या उभारणीस चालना देणे किंवा वित्तपुरवठा करणे ;

(झ) शासकीय अभिकरणे, उद्योग, स्वयंसेवी अभिकरणे व इतर संघटना यांना, त्यांच्या योजना आणि कार्यक्रम यांची अंमलबजावणी करण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान यासंबंधातील निविष्टी पुरविण्यासाठी सल्ला देणे ;

(ञ) विज्ञान व तंत्रज्ञानातील नवनवीन शोधांचा अंतिमतः प्रत्यक्ष वापर करणाऱ्यांनी घेतलेल्या पुढाकारास पाठिंबा, प्रोत्साहन देणे ;

(ट) परस्पर संबंधित प्रकल्पांसाठी समस्तर विभागाचा निधी उभारणे व त्याचा वापर करणे ;

(ठ) प्रकल्प, कार्यक्रम व वित्तपुरवठा यांसाठी देशाबाहेरील संस्था आणि द्विपाक्षिक अभिकरणे व आंतरराष्ट्रीय विकास अभिकरणे यांच्याशी आदानप्रदान करणे.

९. (१) आयोगास, त्याची कर्तव्ये पार पाडताना, कोणत्याही विद्यमान खाजगी किंवा शासकीय शैक्षणिक आणि संशोधन व विकास संघटनांमध्ये उपलब्ध असतील अशा सुविधांचा वापर करता येईल आणि याबाबत केलेल्या विनियमांना अधीन राहून, आयोग, अशा संस्थांना, त्या आयोगाला पुरवित असलेल्या सुविधा किंवा आयोगाच्या वतीने हाती घेत असलेले काम, यांच्या बदल्यात वित्तीय पाठबळ पुरविण्याची व्यवस्था करील. विद्यमान संस्थांमधील मनुष्यबळाचा व सुविधांचा वापर करणे.

(२) या संस्थांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींनी आयोगाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या उपक्रमांमध्ये आपला वेळ दिला असल्यास किंवा तसा वेळ त्या देत असल्यास, असा वेळ देणाऱ्या व्यक्तींचे वेतन व इतर भत्ते यांची प्रतिपूर्ती, आयोगाकडून, विनियमांच्या चौकटीनुसार अशा संस्थांकडे केली जाईल.

१०. (१) आयोगास, तंत्रज्ञानाच्या विकासाकरिता, प्रकल्प तयार करण्याकरिता, प्रात्यक्षिकादाखल प्रकल्प हाती घेण्याकरिता, प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता किंवा आयोगाची अन्य कोणतीही कामे करण्याकरिता निवड करण्यात आलेल्या संस्थांना योग्य ते आर्थिक पाठबळ देता येईल. प्रकल्पाला निधी पुरविणे.

(२) आयोग, संस्था निश्चित करण्याकरिता आणि अशा संस्थांना, पोट-कलम (१) अन्वये आर्थिक पाठबळ देण्याकरिता, विनियम तयार करील.

११. आयोग, विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल त्याप्रमाणे, आवश्यक असेल तेव्हा आणि आवश्यक असेल अशावेळी बैठक घेईल आणि आपल्या बैठकीच्या कामकाजाच्या संबंधात अशी कार्यपद्धती अनुसरील. आयोगाची बैठक.

१२. (१) आयोगास, या अधिनियमाखालील त्याची कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता, त्याच्या मते आवश्यक असेल अशा तंत्रविषयक किंवा प्रकल्पविषयक कर्मचारीवर्गासह अन्य अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल किंवा त्यांना प्रतिनियुक्तीवर घेता येईल. आयोगाच्या अशा अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे दोन प्रवर्ग असतील :— आयोगाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी.

(क) स्थायी कर्मचारीवर्ग.—यामध्ये, आयोगाचे दैनंदिन काम कायम तत्त्वावर करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय आणि सचिवालयीन अधिकाऱ्यांचा आणि कर्मचारीवर्गाचा समावेश होतो ;

(ख) तात्पुरता किंवा प्रकल्पाचा कर्मचारीवर्ग किंवा आनुषंगिक, कंत्राटी किंवा नियत अवधीसाठी नियुक्ती करण्यात आलेला कर्मचारीवर्ग.—यामध्ये, आनुषंगिक नियुक्तीद्वारे किंवा विनिर्दिष्ट प्रकल्पासाठी कंत्राटी तत्त्वावर किंवा विनिर्दिष्ट कालावधीसाठी नियत अवधी तत्त्वावर, तात्पुरती नियुक्ती केलेल्या व्यक्तींचा समावेश होतो.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये निर्देशिलेले आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची पदे, शासनाच्या पूर्वमंजुरीने निर्माण करण्यात येतील.

(३) अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची रीत व वेतन, भत्ते व सेवेच्या इतर अटी व शर्ती, शासनाने त्याबाबतीत काढलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांना अधीन राहून, आयोग निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

अवेक्षण परिषद. १३. (१) आयोगाच्या कामकाजाचे आणि कामगिरीचे पुनर्विलोकन करण्याकरिता, मार्गदर्शन करण्याकरिता आणि आयोगाची कामे सुरळीत आणि कार्यक्षमतेने होण्यासाठी त्यांना धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वे घालून देण्याकरिता, शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एका अवेक्षण परिषदेची नियुक्ती करता येईल.

(२) ही अवेक्षण परिषद घटित होणे, तिची कामे व कर्तव्ये ही, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

## प्रकरण तीन

## निधी, अर्थसंकल्प, लेखे, लेखापरीक्षा व विवरणे

राज्य शासनाचे अनुदान. १४. शासन, राज्य विधानमंडळाने याबाबतीतल्या कायद्याद्वारे यथोचित विनियोजन केल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता वापरण्यासाठी, शासनास योग्य वाटतील अशा रकमा, आयोगास, प्रत्येक वित्तीय वर्षी, राज्याच्या एकत्रित निधीतून अनुदानाच्या रूपाने देईल.

आयोगाचा निधी. १५. (१) आयोग, एक निधी ठेवील, ज्यामध्ये पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(क) राज्य शासनाने आणि केंद्र सरकारने पुरविलेल्या सर्व रकमा ;

(ख) आयोगास प्राप्त झालेली सर्व फी, स्वामित्वधन व इतर आकार ;

(ग) अनुदान, उपहार, दाननिधी, देणग्या, धर्मदान, मृत्यूपत्रित देणग्या किंवा हस्तांतरित केलेल्या रकमा या मार्गाने आयोगास प्राप्त झालेल्या सर्व रकमा ; आणि

(घ) अन्य कोणत्याही रीतीने किंवा अन्य कोणत्याही मार्गाने आयोगास प्राप्त होणाऱ्या सर्व रकमा.

(२) निधीमध्ये जमा करण्यात आलेल्या सर्व रकमा, आयोग निश्चित करील अशा बँकेत किंवा बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात येतील आणि आयोग निश्चित करील अशा रीतीने गुंतविण्यात येतील.

(३) दीर्घ मुदतीची उपाययोजना म्हणून, मूळ निधी निर्माण करण्यासाठी आयोगास उत्तेजन देण्यात येईल.

(४) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, आयोगाने केलेला खर्च भागविण्यासाठी, आयोगाकडून निधीचा वापर करण्यात येईल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी " बँक " या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(एक) भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ अन्वये घटित करण्यात आलेली भारतीय स्टेट बँक ; १९५५ चा २३.

(दोन) भारतीय स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे दुय्यम बँका ; १९५९ चा ३८.

१९७० चा ५. १९८० चा ४०. (तीन) बँक व्यवसायी कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० याच्या कलम ३ अन्वये किंवा बँक व्यवसायी कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० याच्या कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेली तत्सम नवीन बँक, असा आहे.

आयोगाला अनुदान, देणग्या, इत्यादी देणे.

१६. आयोगास, केंद्र सरकारकडून, राज्य शासनाकडून व अन्य राज्य शासनांकडून, कंपन्यांकडून, उद्योगांकडून, संस्थांकडून, व्यक्तींकडून किंवा अन्य कोणत्याही स्रोतांकडून उपहार, अनुदान, देणग्या, धर्मदाने, दाननिधी, मृत्युपत्रित देणग्या प्राप्त करता येतील. तथापि, विशेषतः द्विपार्श्विक किंवा बहुपार्श्विक अभिकरणांकडून मिळालेल्या अशा रकमा, केंद्र सरकारची व राज्य शासनाची कोणतीही धोरणविषयक एकूण मार्गदर्शक तत्त्वे असल्यास, त्यांच्या अधीन असतील.

अर्थसंकल्प.

१७. (१) आयोग, आगामी वित्तीय वर्षाच्या संबंधातील अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा अर्थसंकल्प प्रत्येक वर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी तयार करील, आणि त्याच्या प्रती शासनाला पाठविण्यात येतील.

(२) आयोगाच्या निधीतून करावयाचा खर्च हा, आयोगाचा अर्थसंकल्प शासनाकडून मान्य करण्यात आल्यानंतरच केवळ किंवा खास बाब म्हणून राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने करण्यात येईल :

परंतु, शासनावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, तात्काळ किंवा भविष्यात कोणतेही वित्तीय दायित्व येत नसेल तर, आयोग, आपली ध्येये आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, एखादी बाब शासनाच्या मान्यतेसाठी सादर न करता, शासनाने मान्य केलेल्या अर्थसंकल्पाबाहेरील, कलम १६ अन्वये प्राप्त झालेल्या रकमांतून तिथा कोणताही खर्च करण्यास सक्षम असेल. तथापि, अशा जमा रकमा व खर्च, आयोगाच्या अर्थसंकल्पात, लेख्यांत तसेच वार्षिक अहवालात दाखविण्यात येतील.

लेखे व लेखापरीक्षा.

१८. (१) आयोग, विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात आणि अशा रीतीने आपल्या लेख्यांची अशी लेखापुस्तके व आपल्या लेख्यासंबंधातील अन्य पुस्तके ठेवली जाण्याची व्यवस्था करील.

(२) आयोग, आपले वार्षिक लेखे बंद केल्यानंतर शक्य तितक्या लवकर विहित करण्यात येईल अशा नमुन्यात ताळेबंदासह लेख्यांचे विवरणपत्र तयार करील आणि ते शासनाला सादर करील.

(३) आयोगाच्या लेख्यांची, महाराष्ट्र राज्याच्या महालेखापालाकडून, त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशावेळी व अशा रीतीने लेखापरीक्षा करण्यात येईल आणि असा लेखापरीक्षेच्या संबंधात करण्यात आलेला कोणताही खर्च, आयोगाकडून महालेखापालाला देय असेल.

(४) महालेखापाल व त्याने या अधिनियमान्वये, आयोगाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना, कोणत्याही शासकीय लेखापरीक्षेच्यासंबंधात सर्वसाधारणपणे महालेखापालाला जे हक्क व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतात तेच हक्क व विशेषाधिकार आणि प्राधिकार अशा लेखापरीक्षेच्या संबंधात असतील, आणि विशेषतः पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा हक्क असेल आणि आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(५) आयोगाचे वार्षिक लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह, शासनाकडे पाठविण्यात येतील आणि शासन, अहवाल प्राप्त झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, तो राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवला जाण्याची व्यवस्था करील आणि लेखापरीक्षा अहवालातून उद्भवलेल्या बाबींवर किंवा लेखापरीक्षा आक्षेप, कोणतेही असल्यास, त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी लेखापरीक्षा अहवालाची एक प्रत आयोगाकडे देखील पाठवील.

वार्षिक अहवाल. १९. आयोग, प्रत्येक वर्षी, वर्षातून एकदा, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी, मागील वित्तीय वर्षातील त्यांच्या कार्यक्रमांचा अचूक, खरा आणि संपूर्ण हिशेब देण्यासाठी वार्षिक अहवाल तयार करील आणि त्याच्या प्रती शासनाला पाठविण्यात येतील आणि शासन, तो प्राप्त झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर तो अहवाल ठेवला जाण्याची व्यवस्था करील.

विवरणे व माहिती. २०. आयोग, राज्य शासन वेळोवेळी मागणी करील त्याप्रमाणे, आपली मालमत्ता, लेखे किंवा कार्य यांच्यांशी संबंधित अशी विवरणे किंवा इतर माहिती, शासनास सादर करील.

शासनाकडून निदेश. २१. या अधिनियमाखालील आपली कामे पार पाडण्यासाठी आयोगाला, धोरण आणि कार्यपद्धतीच्या प्रश्नांवर शासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या निदेशांद्वारे मार्गदर्शन केले जाईल.

रिक्त जागा इत्यादीमुळे आयोगाची कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे. २२. आयोग किंवा अवेक्षण परिषद यांनी केलेली कोणतीही कृती किंवा केलेली कोणतीही कार्यवाही केवळ, आयोगात किंवा अवेक्षण परिषदेमध्ये कोणतीही जागा रिक्त असल्याच्या किंवा आयोग किंवा अवेक्षण परिषद यांच्या घटित होण्यात दोष असल्याच्या किंवा कोणत्याही व्यक्तीचे अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यामध्ये कोणताही दोष असल्याच्या कारणांवरून, विवादास्पद किंवा विधिअग्राह्य ठरविली जाणार नाही.

आयोगाच्या आदेशाचे व विलेखांचे अधिप्रमाणन. २३. आयोगाचे सर्व आदेश आणि निर्णय, अध्यक्ष किंवा सदस्य-सचिव किंवा आयोगाने याबाबतीत लेखी प्राधिकृत केलेला इतर कोणताही सदस्य यांच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येतील आणि आयोगाचे इतर सर्व विलेख अध्यक्ष किंवा सदस्य-सचिव किंवा आयोगाने याबाबतीत लेखी प्राधिकृत केलेला असा आयोगाचा इतर कोणताही अधिकारी यांच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येतील.

संघटनेकडे सुपूर्द केलेल्या कामाच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्याचा व आढावा घेण्याचा अधिकार. २४. आयोगास, शासनाचा पाठिंबा असलेल्या संघटनांकडे काम सुपूर्द करण्याचा आणि कोणत्याही संघटनेकडे सुपूर्द केलेल्या कामाच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्याचा व आढावा घेण्याचा अधिकार असेल—मग काम सुपूर्द केलेल्या संघटनेला आयोगाकडून कोणतेही आर्थिक किंवा इतर पाठबळ मिळत असो वा नसो.

आयोगाचे अध्यक्ष, सदस्य व कर्मचारी लोकसेवक असणे आणि सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण. २५. (१) भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार, आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असल्याचे मानले जाईल. १८६० चा ४५.

(२) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा विनियमांच्या किंवा आदेशांच्या तरतुदींना अनुसरून, सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा हेतू असणाऱ्या कोणत्याही गोष्टीसाठी, आयोगाचा कोणताही सदस्य किंवा आयोगाचा कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी किंवा एकतर राज्य शासनाच्या किंवा आयोगाच्या निदेशान्वये काम करणारी कोणतीही व्यक्ती, ज्याच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

२६. (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) अध्यक्ष व सदस्य-सचिव यांच्या व्यतिरिक्त आयोगाच्या अशासकीय सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ख) आयोगाने अर्थसंकल्प तयार करण्याचा नमुना, रीत व वेळ ;

(ग) आयोगाच्या लेख्यांचा नमुना व तो ठेवण्याची पद्धत ;

(घ) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी विहित केली पाहिजे अशी किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच सत्रात किंवा लागोपाठच्या दोन सत्रांत मिळून एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या सत्रात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते सत्र किंवा त्याच्या लगतनंतरचे सत्र समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, ती अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अमलात येईल, किंवा, यथास्थिति अमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

२७. आयोगास, शासनाच्या पूर्वमान्यतेने आणि राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पुढील बाबींसाठी या अधिनियमाच्या व त्या अधिनियमाखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असे विनियम तयार करता येतील :— विनियम करण्याचा अधिकार.

(क) आयोगास सुविधा पुरविणाऱ्या संस्थांना आर्थिक पाठबळ पुरविण्यासाठी, संव्यवस्थांचे विनियमन करणे ;

(ख) कलम १० अन्वये प्रकल्प निधी व आर्थिक पाठबळ देण्यासाठी संस्था निश्चित (identification) करणे ;

(ग) आयोगाच्या बैठकींचे व तेथील कामकाज चालविण्याच्या कार्यपद्धतींचे विनियमन करणे ;

(घ) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी विनियमांद्वारे विनियमित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

२८. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील व या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी, राजपत्रात, आदेश प्रसिद्ध करून करता येतील : अडचण दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० याचे निरसन व व्यावृत्ती.

२९. (१) राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग अध्यादेश, २००४ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००४ चा महा. अध्या. क्रमांक २०.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा केलेले नामनिर्देशन, नियुक्ती अथवा नियम यांसह) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीअन्वये केलेली, काढलेली, यथास्थिति, केलेले असल्याचे मानण्यात येईल.

---

शासकीय मुद्रणालय, नागपूर.